MHOS060003972025

<u>निशाणी क्र. २७ खालील आदेश</u>

१. दावा दुरूस्ती करण्यासाठी वादीने हा अर्ज दिलेला आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, संमतीपत्र आणि हक्कसोड पत्राची माहीती वादीला ऊशिरा समजली आहे आणि ही माहिती प्रतिवादीने लेखी जबाब दाखल केल्यानंतर समजली आहे आणि त्यामुळे त्यांना दावा दुरुस्ती करणे आवश्यक आहे. याउलट, प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, वादीला सर्व गोष्टींची अगोदरच माहिती आहे आणि प्रतिवादींना त्रास देण्यासाठी दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला आहे.

२. या प्रकरणामध्ये मुद्दे निश्चित झालेले नाहीत. हे प्रकरण तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या सुनावणीसाठी असताना दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. परीणामी, दावा दुरुस्ती करण्यासाठी वादीला कोणतीही तांत्रिक अडचणी मला दिसत नाहीत. परीणामी, उचित निकाल लागण्यासाठी दावा दुरुस्तीची परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१. निशाणी क्र. २७ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. दावा तात्काळ दुरुस्ती करण्यात यावा.

Digitally signed by KETANKUMAR UTTAM TELGAONKAR
Date: 2026.01.21 12:20:17 +0530

(केतनकुमार तेलगांवकर)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
उमरगा.

दिनांक २०.०१.२०२६

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment / order are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | ---- | A. A. Joshi, Grade- II |
| Court | --- | Jt. Civil Court, Senior Division, Omerga |
| Date of Decision | --- | 20/01/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | --- | 20/01/2026 |
| Judgment uploaded on | --- | 21/01/2026 |